आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

३० जून २०२४ - रविवार

लोकसभा निवडणुकीत देशातल्या मतदारांनी संविधान आणि लोकशाही व्यवस्थेवरच्या अढळ विश्वासाचं दर्शन घडवल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात च्या एकशे अकराव्या भागात सांगितलं. तीन महिन्यांच्या कालावधीनंतर आपल्या तिसऱ्या कार्यकाळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज प्रथमच आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला.

जगातली सर्वात मोठी सार्वत्रिक निवडणूक यशस्वीपणे पार पडल्याबद्दल त्यांनी निवडणूक यंत्रणा आणि मतदारांचं अभिनंदन केलं तसंच देशवासीयांचे आभार मानले. या निवडणुकीत ६५ कोटी मतदारांनी मतदान केलं, असं कोणत्याही देशात घडलेलं नाही, असं सांगून त्यांनी आपल्या निवडणूक प्रक्रियेचा गौरव केला.

धरतीमातेचं ऋण फेडण्यासाठी, यावर्षीच्या पर्यावरण दिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' ही मोहीम सुरू केली असल्याची माहिती त्यांनी दिली. या मोहीमेअंतर्गत भारतासह जगभरातल्या नागिकांनी आपल्या आईसोबत किंवा तिच्या नावानं एक झाड लावावं, या मोहिमेमुळे आपल्या आईचा सन्मान आणि धरणी मातेचंही रक्षण होईल, असं ते म्हणाले.

पॅरीसमध्ये पुढच्या महिन्यात होणार असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी त्यांनी भारतीय खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

आकाशवाणीच्या संस्कृत बातमीपत्राच्या प्रसारणाला आज ५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी आकाशवाणीचं अभिनंदन केलं.
संस्कृतच्या जतन संवर्धनाच्या प्रयत्नांना हातभार लावायला हवा, असं आवाहन त्यांनी केलं.

**होल्ड बाईट**

जगभरात भारतीय संस्कृती गौरवली जात असल्याचं सांगताना त्याबाबतची अनेक उदाहरणं त्यांनी आज श्रोत्यांसमोर मांडली. कुवेत सरकारनं त्यांच्या राष्ट्रीय आकाशवाणीवर हिंदी भाषेतील विशेष कार्यक्रम सुरू केला असल्याची महिती दिली आणि त्याचा किंचितसा अंश श्रोत्यांना ऐकवला.

दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन जगभरात जल्लोषात साजरा झाल्याचं सांगून ते म्हणाले की, दरवर्षी योगदिनाचे कार्यक्रम नवनवे  विक्रम प्रस्थापित करत आहेत. लवकरच सुरु होणार असलेली जगन्नाथ यात्रा, तसंच अमरनाथ यात्रा आणि पंढरपूरच्या वारीत सहभागी होणाऱ्या भाविकांना प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या. तसंच आगामी कच्छी नववर्ष आणि आषाढी बीज सणाच्याही त्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या.

**<><><><>**

लेफ्टनंट जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी आज भारताचे लष्करप्रमुख म्हणून नवी दिल्ली इथं पदभार स्वीकारला. लेफ्टनंट जनरल द्विवेदी यांनी १९८४ ला भारतीय लष्करातल्या सेवेला सुरुवात केली होती. आपल्या चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांनी विवध पदांवर काम केलं आहे. द्विवेदी यांना आतापर्यंत परम विशिष्ट सेवा पदक आणि अतिविशिष्ट सेवा पदकानं सन्मानित करण्यात आलं आहे.

**<><><><>**

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक संरक्षण संहिता, आणि भारतीय साक्ष्य अधिनियम, हे नवे फौजदारी कायदे उद्यापासून देशभरात लागू होणार आहेत. या पार्श्वभूमीवर न्यायाधीश, वकील यांच्यासह सर्व संबंधितांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीनं  विधी आणि न्याय मंत्रालयाच्या विधी कार्य विभागातर्फे मुंबईत आज आयोजित एका परिषदेचं उद्घाटन केंद्रीय कायदा आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केलं.

राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधी आणि न्याय मंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच मुंबई, गुजरात, पंजाब या उच्च न्यायालयांचे न्यायमूर्ती, या तीन नवीन कायद्यांविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक तब्बल १७ वर्षांनी जिंकणाऱ्या भारतीय संघावर चहूकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भारताच्या या विजयानंतर देशभरात क्रिकेटप्रेमींच्या जल्लोषाला उधाण आलं होतं, मुंबई लह राज्यात सर्वत्र जागोजागी रस्त्यांवर तिरंगा फडकावत क्रिकेट प्रेमींनी विजयोत्सव साजरा केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेस नेते राहुल गांधी, आयसीसीचे माजी अध्यक्ष शरद पवार यांच्यासह विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी भारताच्या विजयाबद्दल अभिनंदन केलं आहे. राहुल द्रविड याचा भारताचे प्रशिक्षक म्हणून हा अखेरचा सामना होता. या सामन्यातल्या विजयानंतर, कर्णधार रोहीत शर्मा तसंच विराट कोहली यांनीही हा आपला अखेरचा टी ट्वेंटी सामना असल्याची घोषणा केली.  अंतिम सामना जिंकल्यानंतर भारतीय संघावर बक्षिसांचाही वर्षाव झाला आहे. विजेतेपदासाठी २० कोटी ३६ लाख रुपयांची रक्कम त्यांनी आपल्या नावे केली. ही आजवरची सर्वात मोठी बक्षिसाची रक्कम ठरली आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका कसोटी सामन्यात आज भारताची स्नेहा राणा हिनं ८ गडी बाद करत इतिहास घडवला. स्नेहाने आठ तर दीप्ती शर्माने दोन गडी बाद केले. आणि दक्षिण आफ्रिकेचा डाव २६६ धावात गुंडाळलाआणि दक्षिण आफ्रिकेवर फॉलोऑन लादला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या १ बाद १३८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

भंडाऱ्यात साकोली उड्डाणपुलावर दुभाजकाला चारचाकी धडकून झालेल्या अपघातात दोघे ठार तर एकजण जखमी झाला आहे. हे सर्वजण कौटुंबिक समारंभासाठी नागपूरला चालले होते.

**<><><><><>**

वाशिम जिल्ह्यातल्या कारंजा, मानोरा, वाशिम, रिसोड आणि मालेगाव तालुक्यांतल्या काही गावांत आठवडाभराच्या विश्रांती नंतर आज पाऊस सुरु झाला आहे. या पावसाचा फायदा पावसाअभावी सुकू लागलेल्या पिकांना होत आहे.

**//<><><><><>//**